• वर्ष : ०३ • अंक : २५१ • पुणे • मंगळवार, दि. ०२ जून २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313







# दैनिक आरंभपर्व


आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com


डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे

**पुण्यातील लोकप्रिय दैनिक**



## थोडक्यात पण महत्वाचे

### ६७ वर्षीय महिलेची तीव्र चेहऱ्याच्या वेदनांपासून सुटका



पुणे (आरंभ पर्व) : गेल्या पाच वर्षांपासून चेहऱ्यात तीव्र वेदना सहन करणाऱ्या ६७ वर्षीय महिलेला मणिपाल हॉस्पिटल, खराडी, पुणे येथे करण्यात आलेल्या प्रगत मेंदू शस्त्रक्रियेमुळे अखेर मोठा दिलासा मिळाला आहे. संबंधित महिला ट्रायजेमिनल न्युराल्जिया या न्यूरोलॉजिकल आजाराने त्रस्त होती. या आजारामध्ये चेहऱ्यावर अचानक विजेचा झटका बसल्यासारख्या तीव्र आणि असह्य वेदना होतात. कालांतराने या वेदना इतक्या वाढल्या की खाणे, बोलणे, दात घासणे आणि चेहरा धुणे यांसारख्या दैनंदिन साध्या गोष्टीदेखील तिच्यासाठी अत्यंत कठीण बनल्या होत्या. दीर्घकाळ औषधोपचार सुरू असूनही तिची लक्षणे वाढतच गेली आणि त्यामुळे तिच्या दैनंदिन आयुष्याबरोबरच मानसिक स्वास्थ्यावरही मोठा परिणाम झाला होता. सविस्तर वैद्यकीय तपासणी आणि प्रगत न्यूरोइमेजिंगनंतर डॉक्टरांना असे आढळून आले की सुपीरियर सेरेबेलर आर्टरी नावाची रक्तवाहिनी ट्रायजेमिनल नर्व्हवर दबाव आणत होती आणि त्यामुळे तीव्र वेदनांचे झटके येत होते. त्यानंतर रुग्णाला मायक्रोव्हॅस्क्युलर डीकंप्रेशन (एमव्हीडी) ही विशेष शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला देण्यात आला. ट्रायजेमिनल न्युराल्जियासाठी ही शस्त्रक्रिया अत्यंत प्रभावी आणि मान्यताप्राप्त उपचारपद्धती मानली जाते.

### ओक्लेने सादर केली ‘प्लेअर्स कलेक्शन’ मोहीम



पुणे (आरंभ पर्व) : एक काळ असा होता जेव्हा खेळाडूने परिधान केलेल्या गोष्टींमध्ये फक्त त्यांच्या गणवेशाला (युनिफॉर्म) महत्त्व असायचे. तो काळ आता संपला आहे. आता खेळाची खरी सुरुवात झगमगाट आणि कोलाहलाच्या आधीच होते; तो एक असा क्षण असतो, जिथे सर्व गोष्टी एकाग्र होतात: म्हणजेच स्टेजवर येण्यापूर्वीची पूर्वतयारी. आजच्या क्रीडा संस्कृतीला आकार देणाऱ्या खेळाडूंसोबत मिळून तयार केलेल्या प्लेअर्स कलेक्शनच्या नवीन चॅप्टरद्वारे ओक्लेने दोन दिग्गज खेळाडूंचे सिग्नेचर आयवेअर सादर केले आहेत, ज्यामध्ये प्रत्येकाची स्वतःची सह-निर्मित कलाकृती समाविष्ट आहे. ओक्ले प्लेअर्स कलेक्शन आता टीम ओक्लेचे खेळाडू जेलिन ब्राउन आणि किलियन एम्बाप्पे यांच्या नवीन सिग्नेचर सिरीजसह पुढे जात आहे. हे असे आयकॉन्स आहेत, जे फक्त खेळ खेळत नाहीत, तर खेळाचा स्तर उंचावून, नवीन इतिहास रचून आणि समुदाय निर्माण करून खेळाभोवतीच्या संस्कृतीला एक नवा आकार देतात.

### ४ लाखांहून अधिक भारतीयांची योगाकडे वाटचाल

- MDNIY, आयुष मंत्रालय आणि हॅबिल्डचा संयुक्त उपक्रम

नवी दिल्ली (आरंभ पर्व) : योगाला दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवण्यासाठी मोरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्था (MDNIY), आयुष मंत्रालय आणि हॅबिल्ड यांनी महत्त्वपूर्ण भागीदारी केली आहे. या सहयोगाअंतर्गत आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६च्या पार्श्वभूमीवर देशव्यापी डिजिटल योग अभियान सुरू करण्यात आले असून, लाखो नागरिकांना नियमित योगाभ्यासासाठी प्रोत्साहित केले जात आहे. MDNIY आणि भारतातील पहिले हॅबिट-बिल्डिंग प्लॅटफॉर्म असलेल्या हॅबिल्ड यांच्यात नुकताच सामंजस्य करार (MoU) झाला आहे. या कराराअंतर्गत सुरू करण्यात आलेल्या ‘योगा ३६५’ उपक्रमाला देश-विदेशातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. मार्च २०२६ मध्ये सुरू झालेल्या या मोहिमेचा उद्देश नागरिकांना सलग १०० दिवस दररोज योगाभ्यास करण्यासाठी प्रेरित करणे हा आहे. या उपक्रमात आतापर्यंत ४ लाखांहून अधिक सक्रिय सहभागी सहभागी झाले असून, ते १३० पेक्षा जास्त देशांमधून तसेच भारतातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधून या अभियानात सहभागी झाले आहेत. २१ जून, आंतरराष्ट्रीय योग दिनापर्यंत हा आकडा आणखी वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



### अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त मोफत डोळे तपासणी शिबिर

दौंड (आरंभ पर्व) : कुशल प्रशासक, न्यायप्रिय, मुत्सद्दी, लोककल्याणकारी राणी, ज्यांनी देशातील अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार केला अशा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त ग्रामपंचायत कार्यालयामध्ये पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. गावच्या प्रशासक सरपंच सौ.पुनम मदने व ग्रामपंचायत अधिकारी श्रीम.स्वाती लोंढे यांनी केलेल्या विनंतीस मान देऊन एच व्ही देसाई नेत्र तपासणी केंद्र भिगवन यांच्या वतीने मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया व डोळे तपासणी शिबिराचे आयोजन केले होते.यावेळी नेत्रचिकित्सक गीतांजली पालवे,सहकारी प्रियांका मारकड यांनी गावातील उपस्थित नागरिक यांना डोळ्याचे महत्व,आजार आणि उपाय याबाबत मार्गदर्शन करून लाभार्थी यांची तपासणी केली.यावेळी उपसरपंच प्रकाश होले,पोपट वाघमारे,त्रिंबक राजपुरे,गणेश मींढे,सखाराम कांबळे,सोमनाथ वेताळ आदी ग्रामस्थ व कर्मचारी उपस्थित होते.मच्छिंद्र मदने यांनी वैद्यकीय अधिकारी यांचे आभार मानले.

### प्रशासकीय आकडा अकरा, प्रत्यक्षात मात्र १६ जणांचा मृत्यू

पिंपरी/पिंपळे गुरव (आरंभ पर्व) : फुगेवाडीत विषारी दारू प्रकरणातील मृतांच्या कुटुंबीयांना शासनाने आर्थिक मदत जाहीर केली आहे. मात्र, या दुर्घटनेतील सर्व मृत व्यक्ती खरोखरच प्रशासनाच्या नोंदीत आले आहेत का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. सोमवारपर्यंत १६ जणांचे मृत्यू झाले असताना पोलिसांकडे अकरा जणांचीच नोंद आहे. दुर्घटनेच्या दिवशी ३० पेक्षा जास्त जणांनी विषारी दारू प्राशन केल्याची चर्चा आहे. यातील अनेक जण आजूबाजूच्या परिसरातून आले. अनेकांनी खासगी रुग्णालयात उपचार घेतले, काही जण गावाकडे परतले. तर काहींची नोंद कुठेच नाही. या पार्श्वभूमीवर फुगेवाडी परिसरातील सीएमईमधील लेबर कॅम्पमध्ये पत्रकारांना प्रवेश नाकारण्यात आल्याने चर्चा वाढली आहे. तेथेही काही जणांचा बळी गेल्याची माहिती समोर येत आहे.

# ‘दोषी अधिकाऱ्यांकडून निधी वसूल करा’ – गोपाळदादा तिवारी

## लाडकी बहीण योजनेतील अपात्र लाभार्थ्यांवरून काँग्रेसचा सरकारवर हल्लाबोल

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील सुमारे ८१ लाख लाभार्थी अपात्र ठरल्यानंतर त्यांच्या नावांची यादीतून वगळणी करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी राज्य सरकार आणि प्रशासनावर जोरदार टीका केली आहे. अपात्र लाभार्थ्यांना कोट्यवधी रुपयांचा सरकारी निधी वितरित झाल्याबद्दल संबंधित सचिव आणि अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करून राज्याच्या तिजोरीचे झालेले नुकसान त्यांच्याकडून वसूल करण्याची मागणी त्यांनी केली आहे.



> लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी पडताळणी, अपात्र लाभार्थ्यांना वितरित झालेला निधी आणि त्यासंदर्भातील प्रशासकीय जबाबदारी यावरून राज्यातील राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे दिसत आहेत. काँग्रेसने या मुद्द्यावर सरकारला लक्ष्य केले असून, आगामी काळात या प्रकरणावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

प्रसिद्धीपत्रकाद्वारे तिवारी यांनी म्हटले आहे की, विधानसभा निवडणुकीपूर्वी जाहीर करण्यात आलेल्या लाडकी बहीण योजनेअंतर्गत अर्ज करणाऱ्या महिलांना दरमहा १,५०० रुपयांचे अनुदान मंजूर करून वितरित करण्यात आले. मात्र आता तब्बल ८१ लाख लाभार्थी अपात्र ठरत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे लाभार्थी पात्रता तपासण्याची जबाबदारी असलेल्या महिला व बालविकास विभाग, अर्थ विभाग आणि संबंधित प्रशासकीय यंत्रणांनी सुरुवातीपासूनच आवश्यक पडताळणी का केली नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

तिवारी म्हणाले की, अपात्र लाभार्थ्यांची वगळणी झाल्यामुळे दरमहा सुमारे १,२०० कोटी रुपयांची बचत होणार असल्याचे सांगितले जात आहे. यावरून आतापर्यंत राज्याच्या तिजोरीवर अंदाजे १८ हजार कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार का टाकण्यात आला, याची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. यासाठी संबंधित सनदी अधिकारी, सचिव आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

यासोबतच काही लाभार्थी वयोमर्यादेबाहेर असून काही सरकारी कर्मचारीदेखील योजनेचा लाभ घेत असल्याचे प्रशासनाने नंतर उघड केले. जर हे निकष मतदानानंतर लक्षात येत असतील, तर ही बाब प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी असल्याचे तिवारी यांनी नमूद केले.

काँग्रेसने या प्रकरणाला केवळ आर्थिक गैरव्यवस्थेचा मुद्दा न मानता लोकशाही प्रक्रियेशी संबंधित गंभीर बाब असल्याचे म्हटले आहे. अपात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याच्या निर्णयामुळे राज्याच्या आर्थिक हिताला धक्का बसल्याचा आरोप करताना, अशा धोरणात्मक त्रुटींमुळे राज्यात चुकीचे सरकार निवडले जाण्यास मदत झाल्याची खंतही तिवारी यांनी व्यक्त केली.

तसेच, महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव, राज्यपाल आणि आवश्यक असल्यास उच्च न्यायालयाने या संपूर्ण प्रकरणाची गंभीर दखल घेऊन चौकशी करावी, अशी मागणी काँग्रेसने केली आहे. दोषी अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई न झाल्यास त्यांच्या नावांचा शोध घेऊन काँग्रेस कार्यकर्ते राज्यभर आंदोलन छेडतील, असा इशाराही तिवारी यांनी दिला.

## शाह खंडेलवाल जैन अँड असोसिएट्सचा ६० वर्षांचा गौरवशाली प्रवास



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील प्रतिष्ठित चार्टर्ड अकाउंटंट फर्म शाह खंडेलवाल जैन अँड असोसिएट्स (SKJ) ने आपल्या स्थापनेची ६० वर्षे पूर्ण केल्याचा ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. या निमित्ताने पुण्यातील एका आलिशान हॉटेलमध्ये दोन दिवस चाललेल्या ‘रीकनेक्ट २०२६’ या विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला ग्राहक, माजी विद्यार्थी (अलुम्नी) आणि हितचिंतकांसह १,००० हून अधिक मान्यवर उपस्थित होते. सन १९६६ मध्ये दूरदृष्टी लाभलेले स्वर्गीय सी. व्ही. खंडेलवाल यांनी या संस्थेची स्थापना केली. त्या काळात पुणे हे ‘पेन्शनर्स पॅराडाईज’ म्हणून ओळखले जात होते. गेल्या सहा दशकांत संस्थेने सातत्यपूर्ण प्रगती करत व्यावसायिक उत्कृष्टता, विश्वासार्हता आणि ग्राहककेंद्री सेवा यांमुळे स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. आज संस्थेचे मुख्यालय पुण्यात असून औरंगाबाद, इंदूर आणि बागलकोट येथे नेटवर्क कार्यालये कार्यरत आहेत. या विशेष प्रसंगी बोलताना संस्थेचे भागीदार आशीष खंडेलवाल म्हणाले, “आमचे काही ग्राहक गेली जवळपास सहा दशके आमच्याशी जोडलेले आहेत. ग्राहकांनी SKJ वर दाखविलेला विश्वासच आम्हाला सातत्याने उत्कृष्टतेकडे वाटचाल करण्यासाठी प्रेरणा देतो.” संस्थेचे भागीदार नीलेश खंडेलवाल म्हणाले, “बदलत्या काळानुसार स्वतःमध्ये सातत्याने बदल घडवून आणल्यामुळेच SKJ आजही तितकीच सुसंगत आणि सक्षम आहे. ग्राहक सेवेत अधिक गुणवत्ता आणण्यासाठी आम्ही कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि आमचा दीर्घ अनुभव यांची सांगड घातली आहे. संस्थेची तिसरी पिढी नेतृत्वासाठी सज्ज असून जागतिक स्तरावर विस्तार करण्यावरही आमचा भर आहे.” सध्या संस्थेत २०० हून अधिक व्यावसायिक कार्यरत आहेत. आतापर्यंत १,००० हून अधिक चार्टर्ड अकाउंटंट्सनी येथे आर्टिकलशिप पूर्ण केली असून त्यापैकी अनेक जण आज देशातील आघाडीच्या कंपन्यांमध्ये वरिष्ठ पदांवर कार्यरत आहेत.

## PM-SETU अंतर्गत देशातील पहिली धोरणात्मक गुंतवणूक योजना मंजूर





**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

प्रधान मंत्री स्किलिंग अँड एम्प्लॉयॅबिलिटी ट्रान्सफॉर्मेशन थ्रू अपग्रेडेड ITI (PM-SETU) योजनेअंतर्गत एक मोठा निर्णय घेण्यात आला आहे. राष्ट्रीय सुकाणू समिती (NSC) ने आंध्र प्रदेशमधील विशाखापट्टणम ITI क्लस्टरच्या धोरणात्मक गुंतवणूक योजना (SIP) ला मंजुरी दिली आहे. ही योजना आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडिया (AM/NS India) आणि त्यांची शैक्षणिक भागीदार संस्था न्यू एज मेकर्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (NAMTECH) यांनी मिळून सादर केली होती. PM-SETU योजनेअंतर्गत मंजूर झालेली ही देशातील सर्वात पहिली धोरणात्मक गुंतवणूक योजना आहे. या मंजुरीमुळे या योजनेअंतर्गत औद्योगिक भागीदारी सुरू करणारे आंध्र प्रदेश हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. कौशल भवन, नवी दिल्ली येथे भारत सरकारच्या कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय (MSDE) द्वारे आयोजित करण्यात आलेल्या 3 ऱ्या राष्ट्रीय सुकाणू समिती बैठकीत ही मंजुरी देण्यात आली. राज्य सरकारे आणि आघाडीच्या औद्योगिक कंपन्यांमधील भक्कम भागीदारीच्या माध्यमातून सरकारी ITI चे रूपांतर उद्योगांद्वारे व्यवस्थापित आणि उत्तम निकाल देणाऱ्या संस्थांमध्ये करणे, हे PM-SETU योजनेचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दिशेने पडलेले हे पहिले ठोस पाऊल आहे. या बैठकीचे अध्यक्षपद कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाच्या सचिव श्रीमती देवश्री मुखर्जी यांनी भूषवले, तर या बैठकीला प्रशिक्षण महासंचालनालयाचे (DGT) महासंचालक श्री दिलीप कुमार यांच्यासह राष्ट्रीय सुकाणू समितीचे सदस्य उपस्थित होते.

# पुण्यात शिवसेना पक्षात संघटनात्मक खांदेपालट

## शिवसेना (उबाठा) खडकवासला विधानसभा प्रमुखपदी शिवाजीराव मते पाटील यांची नियुक्ती

- खडकवासला मतदारसंघातील शिवसेना काम करणार; शिवाजीराव मते

**पुणे-लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने पुणे शहरात संघटनात्मक बांधणीला गती देत महत्त्वाचे बदल करण्यास सुरुवात केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून खडकवासला विधानसभा मतदारसंघ प्रमुखपदी शिवाजीराव मते पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेनेचे मुखपत्र सामना मध्ये याबाबतची नियुक्ती प्रसिद्ध करण्यात आली असून, त्यानुसार खडकवासला विधानसभा मतदारसंघाची धुरा आता शिवाजीराव मते पाटील यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. शिवाजीराव मते पाटील यांचा राजकीय प्रवास मनसेमधून सुरू झाला. ते पूर्वी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पुणे शहर वाहतूक सेनेचे अध्यक्ष म्हणून कार्यरत होते. त्यानंतर त्यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात प्रवेश केला. पुणे महानगरपालिका निवडणुकीत त्यांनी प्रभाग क्रमांक ३३ मधून पक्षाच्या उमेदवार म्हणून निवडणूक लढवली होती. निवडणुकीनंतरही त्यांनी पक्षाशी एकनिष्ठ राहून संघटनात्मक कामात सक्रिय सहभाग कायम ठेवला. त्यांच्या कार्याची दखल घेत पक्ष नेतृत्वाने त्यांच्यावर खडकवासला विधानसभा प्रमुखपदाची महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे.







> पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे मी आभार मानतो.. माझ्यासारख्या युवा नेतृत्वावर विश्वास ठेवून पक्षाने ताकद दिली आहे. आगामी काळामध्ये खडकवासला विधानसभा मतदारसंघातील जनतेच्या प्रश्नांना शिवसेना स्टाईलने मांडण्याचा प्रयत्न केला जाईल. लवकरच संघटनात्मक नियुक्ती करण्यात येतील.
>
> **- शिवाजीराव मते पाटील, खडकवासला विधानसभा प्रमुख शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष)**

नियुक्तीनंतर शिवाजीराव मते पाटील यांनी पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे, खासदार संजय राऊत, पक्षाच्या प्रवक्त्या सुषमा अंधारे, पुणे संपर्कप्रमुख सचिन अहिर, गजानन थरकुडे शहरप्रमुख वसंत मोरे, संजय मोरे, मनपा गटनेते,नितीन गावडे,जिल्हा प्रमुख प्रकाश भेगडे , माजी जिल्हा परिषद सदस्य विलास अण्णा मते पाटील , जिल्हा उपप्रमुख महेश मते यांच्यासह सर्व वरिष्ठ नेत्यांचे आभार मानले.

त्यांच्या नियुक्तीनंतर कार्यकर्ते आणि समर्थकांकडून अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. खडकवासला विधानसभा मतदारसंघातील जनतेचे प्रश्न प्रभावीपणे मांडण्यासाठी आणि संघटना अधिक मजबूत करण्यासाठी पक्ष निश्चितपणे प्रयत्नशील राहील, असा विश्वास मते पाटील यांनी व्यक्त केला.

मनसेतील आक्रमक आणि संघटनात्मक पार्श्वभूमी असलेल्या शिवाजीराव मते पाटील यांच्यावर पक्षाने मोठी जबाबदारी सोपविली आहे. आगामी काळात ते या संधीचे सोने करून खडकवासला मतदारसंघात पक्षाची ताकद वाढविण्यात कितपत यशस्वी ठरतात, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# नगरसेविका धनश्री कोल्हे यांच्या कार्यालयाचे उद्घाटन

## प्रभाग क्रमांक ३३ च्या विकासासाठी कटिबद्ध : दत्ताभाऊ कोल्हे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



प्रभाग क्रमांक ३३ मधील नागरिकांच्या समस्या तत्परतेने सोडविणे, शासकीय योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचविणे तसेच परिसरातील विकासकामांना गती देण्याच्या उद्देशाने न्यू कोपरे येथील दामिनी मंगल कार्यालय परिसरात भाजप नगरसेविका सौ.धनश्री दत्ताभाऊ कोल्हे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात आणि मोठ्या जल्लोषात संपन्न झाले.


भाजपा महाराष्ट्र प्रदेश किसान मोर्चाचे उपाध्यक्ष मा. अरुणभाऊ दांगट, नगरसेवक सुभाष नाणेकर आणि नगरसेविका सौ. धनश्रीताई दत्ताभाऊ कोल्हे यांच्या शुभहस्ते कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी परिसरातील नागरिक, कार्यकर्ते आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रभाग क्रमांक ३३ हा पुणे शहरातील विस्तीर्ण आणि लोकसंख्येच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रभाग असून न्यू कोपरे, कोंढवे-धावडे, शिवणे उत्तमनगर आणि आसपासच्या परिसरातील नागरिकांच्या विविध समस्या, विकासकामांच्या मागण्या, शासकीय कार्यालयांशी संबंधित अडचणी तसेच नागरी सुविधांबाबत पाठपुरावा करण्यासाठी हे जनसंपर्क कार्यालय सुरू करण्यात आले आहे. यावेळी बोलताना प्रदेश भाजपा ओबीसी मोर्चा सचिव दत्ताभाऊ कोल्हे यांनी सांगितले की, "प्रभाग क्रमांक ३३ मधील नागरिकांनी आमच्यावर दाखविलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी आम्ही सातत्याने कार्यरत राहणार आहोत. रस्ते, पाणीपुरवठा, जलनिस्सारण व्यवस्था, स्वच्छता, उद्याने, सार्वजनिक सुविधा तसेच इतर नागरी प्रश्न सोडविण्यासाठी जनसंपर्क कार्यालय प्रभावी माध्यम ठरेल. नागरिकांच्या प्रत्येक प्रश्नासाठी हे कार्यालय कायम खुले राहील. प्रभागातील प्रलंबित विकासकामे मार्गी लावण्यासाठी तसेच नवीन विकासकामे मंजूर करून घेण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहणार आहोत."

कार्यक्रमास नगरसेवक मा. सचिनभाऊ मोरे, भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेश सचिव मा. दत्ताभाऊ कोल्हे, मा. विजयबकोल्हे, मा. भगवान मोरे, महिला मोर्चा अध्यक्ष सौ. मनीषाताई मोरे, सौ. सायली भोसले, सौ. निलिमा गवांडे, मा. अमोल तोडकर, मा. अभिजित धावडे, युवा मोर्चा अध्यक्ष मा. निखिल धावडे, मा. उमेश सरपाटील, अभिजीत कांबळे तसेच विविध सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी जनसंपर्क कार्यालयाच्या उपक्रमाचे स्वागत करताना नागरिकांना थेट संवादाचे व्यासपीठ उपलब्ध झाल्याचे सांगितले. परिसराच्या विकासासाठी लोकसहभाग आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा आवश्यक असून हे कार्यालय त्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

उद्घाटन सोहळ्यानंतर उपस्थित नागरिकांनी परिसरातील विविध विकासकामांबाबत सूचना व मागण्या मांडल्या. नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आणि प्रभाग क्रमांक ३३ चा सर्वांगीण विकास साधण्यासाठी कटिबद्ध असल्याचे यावेळी उपस्थित मान्यवरानी सांगितले.

## समाज म्हणून इतिहासातील चुकांची पुनरावृत्ती टाळायला हवी



- ज्येष्ठ पत्रकार पुष्पेंद्र कुलश्रेष्ठ यांचे प्रतिपादन
- ब्राह्मण सांस्कृतिक संघ आणि 'हर घर सावरकर' संस्थेतर्फे व्याख्यान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"जो समाज इतिहासाकडून शिकत नाही आणि भूतकाळातील चुका पुन्हा करतो, त्याचे भवितव्य शंकास्पद राहते. त्यामुळे भारतीय समाज म्हणून आपण इतिहासाकडून बोध घेतला पाहिजे आणि चुकांची पुनरावृत्ती टाळली पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार आणि प्रभावी वक्ते पुष्पेंद्र कुलश्रेष्ठ यांनी केले. याच मनोवृत्तीमुळे तत्कालीन समाज स्वातंत्र्यवीर सावरकर आणि सुभाषचंद्र बोस यांच्या बाजूने ठामपणे उभा राहिला नाही, याकडेही त्यांनी लक्ष वेधले. राम मंदीराच्या उभारणीमध्ये शहीद झालेल्या कारसेवकांचे नाव आयोध्येत व इतिहासात कोरले जावे, यासाठी आपण मोहीम हाती घेऊ आणि त्याची सुरुवात बाणेर सभेमधून होतेय, याचा आनंद वाटत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त ब्राह्मण सांस्कृतिक संघ आणि हर घर सावरकर या संस्थांच्या वतीने आयोजित व्याख्यानात कुलश्रेष्ठ बोलत होते. बाणेर येथील माऊली गार्डनमध्ये आयोजित कार्यक्रमावेळी हिंदू आध्यात्मिक सेवा संस्थेचे अध्यक्ष आणि प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक कृष्णकुमार गोयल, सावरकर विचार दर्शनचे संपादक आणि स्वातंत्र्यवीर सावरकरांचे नातू सात्यकी सावरकर, हर घर सावरकरचे गिरीश देशपांडे, ब्राह्मण सांस्कृतिक संघाचे उमेश फडके, उमा गाडगीळ, अस्मिता करंदीकर आदी मान्यवर उपस्थित होते. कुलश्रेष्ठ यांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि सावरकर प्रतिमापूजन करून कार्यक्रमाची सुरवात झाली.

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
मंगळवार, दि. ०२ जून २०२६






## थोडक्यात पण महत्वाचे



### ‘मालिका संपतेय, पण गोष्ट सुरूच राहणार’ : डॉ. अमोल कोल्हे

उरुळी कांचन (आरंभ पर्व) : 'मी सावित्रीबाई जोतिराव फुले' मालिकेसंदर्भात डॉ.अमोल कोल्हे यांचे सूचक ट्विट. मी सावित्रीबाई जोतिराव फुले मालिका बंद होणार, डॉ.अमोल कोल्हे यांचा सोशल मिडियावरील चर्चांना दुजोरा. 'मालिका बंद होत असली तरी गोष्ट सुरुच राहणार' डॉ. अमोल कोल्हेंकडून लवकरच मोठ्या घोषणेची शक्यता. मालिका बंद होण्याचं कारण अजूनही अस्पष्ट, डॉ. अमोल कोल्हेंच्या भूमिकेकडे प्रेक्षकांचे लक्ष. 'मी सावित्रीबाई जोतिराव फुले' ही लोकप्रिय मालिका लवकरच प्रेक्षकांचा निरोप घेणार असल्याच्या सोशल मिडियावर चर्चा सुरु होत्या. या चर्चांना पूर्णविराम देत मालिकेतील महात्मा जोतिराव फुलेंची भूमिका साकारणारे अभिनेते डॉ. अमोल कोल्हे यांनी सोशल मीडियावर केलेल्या सूचक ट्विटमुळे मालिकेच्या समाप्तीबाबत सुरू असलेल्या चर्चांना दुजोरा मिळाला आहे. 'मालिका संपतेय, पण गोष्ट सुरूच राहणार' असे ट्विट करत डॉ. अमोल कोल्हे यांनी काही दिवसांत एखादी महत्त्वपूर्ण घोषणा करण्याचे संकेत दिले आहेत. त्यांच्या या पोस्टमुळे प्रेक्षक आणि चाहत्यांमध्ये विविध तर्क-वितर्कांना उधाण आले असून, नेमकी कोणती नवी संकल्पना किंवा उपक्रम समोर येणार याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. दरम्यान, मालिका बंद होण्यामागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. याबाबत वाहिनी किंवा निर्मात्यांकडून अधिकृत भूमिका जाहीर करण्यात आलेली नसली, तरी सोशल मीडियावर यासंदर्भात मोठ्या प्रमाणात चर्चा रंगत आहेत. महात्मा जोतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्यावर आधारित या मालिकेला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला होता. त्यामुळे मालिका समाप्त होत असली तरी डॉ. अमोल कोल्हे यांच्या सूचक वक्तव्यामुळे फुले दांपत्यांच्या विचारांचा आणि कार्याचा प्रवास नव्या माध्यमातून पुढे सुरू राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आता डॉ. अमोल कोल्हे नेमकी कोणती घोषणा करतात, याकडे प्रेक्षकांसह सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

### ह्युंदाई मोटर इंडिया लि.ची मे महिन्यामध्ये ४७,८३७ युनिटसची विक्री

गुरुग्राम (आरंभ पर्व) : ह्युंदाई मोटर इंडिया लि.(एचएमआयएल) ने मे महिन्यामध्ये भारतात 47,837 युनिटसची विक्री केली असून गेल्या वर्षीच्या याच काळाच्या तुलनेत 9.1 टक्के वाढ दर्शवली आहे.13,300 युनिटसच्या निर्यातीसह मे महिन्यातील एकूण विक्री ही 61,137 युनिटसची होती. गेल्या वर्षीच्या याच काळाच्या तुलनेत 4.1 टक्के वाढ झाली आहे.

### हिंदू संस्कृतीचा प्रचार करणे हे सर्वांचेच कर्तव्य - चारुदत्त आफळे




पुणे (आरंभ पर्व) : गजवा ए हिंद करण्यासाठी अनेक लोक प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे काम करत आहेत. या देशात हिंदू जिवंतच राहू नयेत यासाठी प्रयत्न केले जात आहेत. ही मानसिकता हाणून पाडण्यासाठी प्रत्येकाने हिंदू संस्कृतीचा आपापल्या परीने प्रचार आणि प्रसार करणे गरजेचे आहे नव्हे तर ती काळाची गरज बनली आहे. हिंदू संस्कृतीचा प्रचार आणि प्रसार करणे आपले कर्तव्यच आहे असे मत जेष्ठ राष्ट्रीय कीर्तनकार चारुदत्त आफळे यांनी व्यक्त केले. नागरिक सोशल फाउंडेशन तर्फे प्रियकर हिंदुस्थान या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानमाला मध्ये चारुदत्त आफळे बोलत होते. यावेळी वक्ता विभाग प्रमुख दीपक मेहंदळे, संचालक अमेय सप्रे ,प्रीतम थोरवे, शेखर यादव आदी यावेळी उपस्थित होते. चारुदत्त आफळे म्हणाले, हिंदू किंवा हिंदुस्थान हे शब्द उच्चारताना आपल्याला संकोचल्यासारखे वाटावे अशी आज परिस्थिती निर्माण झाली आहे. इतर संस्कृती किंवा देश आपले नाव उच्चारताना अभिमानाची भावना त्यांच्या मनामध्ये निर्माण होते परंतु आपल्याला मात्र संकोचिलासारखे होते ही केवळ आपल्यासाठीच नव्हे तर हिंदू संस्कृतीसाठी धोकादायक बाब आहे. त्यामुळे हिंदू संस्कृतीचा प्रचार आणि प्रसार करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे ही भावना आपण मनामनामध्ये रुजवली पाहिजे असे आवाहन चारुदत्त आफळे यांनी यावेळी केले.

### ‘८ वाजून १३ मिनिटे’ आजपासून ‘अल्ट्रा झकास’ ओटीटी वर प्रदर्शित!



मुंबई (आरंभ पर्व) : आयुष्यातील काही क्षण असे असतात, जे सगळंच बदलून टाकतात... आणि जर त्या क्षणासोबत मृत्यूची चाहूल जोडली गेली, तर? अशाच रहस्य, भावना आणि अनपेक्षित घटनांनी भरलेली ‘८ वाजून १३ मिनिटे’ ही बहुचर्चित मराठी वेब सिरीज आज, २९ मे २०२६ पासून ‘अल्ट्रा झकास’ मराठी ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित झाली आहे. प्रदर्शनापूर्वीच आपल्या थरारक ट्रेलरमुळे चर्चेत आलेल्या या वेब सिरीजची प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता होती. आता ही सिरीज प्रेक्षकांना रहस्य, मानसिक संघर्ष आणि भावनिक गुंतागुंत यांचा वेगळाच अनुभव देण्यासाठी सज्ज झाली आहे.‘८ वाजून १३ मिनिटे’मध्ये एका साध्या आणि प्रामाणिक माणसाच्या आयुष्यात अचानक घडणाऱ्या घटनांमुळे निर्माण होणारा तणाव, नात्यांमधील बदल आणि वाढत जाणारे रहस्य प्रभावीपणे मांडण्यात आले आहे. प्रत्येक भागामध्ये सस्पेन्ससोबतच मानवी भावनांचीही तीव्रता जाणवते, त्यामुळे ही सिरीज प्रेक्षकांना शेवटपर्यंत खिळवून ठेवते. ‘सौभाग्यवती सरपंच’, ‘आयपीसी’, ‘राख’ आणि ‘खोताची वाडी’ यांसारख्या वेगळ्या आशयाच्या ओरिजिनल्सनंतर ‘अल्ट्रा झकास’ पुन्हा एकदा प्रेक्षकांसाठी दर्जेदार आणि हटके कंटेंट घेऊन आले आहे. या वेब सिरीजमध्ये पहिल्यांदाच सुनील बर्वे आणि ऐश्वर्या नारकर ही लोकप्रिय जोडी एकत्र झळकत असून, त्यांच्या दमदार अभिनयाची विशेष चर्चा होत आहे. दिग्दर्शक गिरीश मोहिते यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेल्या या वेब सिरीजमध्ये शरद पोंक्षे, उदय सबनीस, संजीव जोटांगिया आणि विनीत शर्मा हे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसत आहेत. रहस्य आणि भावनिक नाट्य यांचा उत्तम समतोल साधणारी ‘८ वाजून १३ मिनिटे’ ही वेब सिरीज आता ‘अल्ट्रा झकास’ मराठी ओटीटीवर प्रेक्षकांसाठी उपलब्ध आहे.

# राजाभाऊ राऊत यांच्यावर भाजपचा विश्वास

## विधान परिषदेसाठी उमेदवारी अर्ज दाखल : सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील महायुतीच्या विजयाचा निर्धार





**सोलापूर (दै. आरंभ पर्व)**

सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने बार्शीचे माजी आमदार राजाभाऊ (राजेंद्र) राऊत यांच्यावर विश्वास दाखवत त्यांना उमेदवारी दिली आहे.

पक्षाच्या या निर्णयामुळे बार्शीसह संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात भाजप आणि महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, उमेदवारी जाहीर होताच अनेक ठिकाणी फटाके फोडून आणि मिठाई वाटून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

राजाभाऊ राऊत यांनी भाजपचे संघटन मजबूत करण्यासाठी सातत्याने काम केले. मराठा आरक्षण आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी पक्ष आणि सरकारची भूमिका ठामपणे मांडली. विधानसभा निवडणुकीत त्याचा राजकीय फटका बसला असला तरी पक्षावरील त्यांची निष्ठा आणि जनतेशी असलेला संपर्क कायम राहिला. बार्शी कृषी उत्पन्न बाजार समिती, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये भाजपला मिळालेल्या यशामागे राऊत यांचे योगदान महत्त्वपूर्ण मानले जाते. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील त्यांची मजबूत पकड आणि कार्यकर्त्यांशी असलेला घनिष्ठ संपर्क यामुळे त्यांची उमेदवारी भाजपसाठी महत्त्वाची मानली जात आहे.

दरम्यान, सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी भाजप-महायुतीचे उमेदवार राजाभाऊ राऊत यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी शिवसेनेच्या खासदार ज्योति वाघमारे, आ.विजय देशमुख, सचिन कल्याणशेट्टी, बाबासाहेब देशमुख,माजी आमदार दिलीप माने, शहाजीबापू पाटील, राम सातपुते, संजय मामा शिंदे, शहाजी पवार यांच्यासह पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या कार्यक्रमाला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद आणि कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती ही महायुतीच्या संघटनात्मक ताकदीची प्रचिती देणारी ठरली. भाजपने राजाभाऊ राऊत यांच्यावर दाखविलेला विश्वास आणि कार्यकर्त्यांमधील उत्साह पाहता सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात महायुतीचा विजयाचा निर्धार अधिक दृढ झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

> जर पक्षासाठी तुम्ही प्रामाणिक काम केले तर निश्चितपणे अशा संधी प्रत्येकाला प्राप्त होतात. पक्षाने माझ्यासारख्या कार्यकर्त्यावर जो विश्वास दाखवला आहे त्या विश्वासास पात्र राहून जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करणार आहे.. सर्व वरिष्ठ नेते मंडळीचे मनापासून आभार मानतो.
> **- राजाभाऊ राऊत उमेदवार, विधानपरिषद भाजपा**

## निवंगुणे यांनी स्वीकारला काँग्रेस जिल्हाध्यक्ष पदाचा कार्यभार



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे जिल्हा काँग्रेस कमिटीचे नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष (दक्षिण विभाग) लहू अण्णा निवंगुणे यांनी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. काँग्रेसभवन येथे रविवारी प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज मोरे, जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष उमेश पवार, निखिल कवीश्वर, आकाश मोरे, संभाराजे जगताप, साहेबराव फडतरे, विरधवल गाडे, वैभव बुरंगुले, प्रदीप मेहकरे, संकेत गवरी यांच्यासह काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी झालेल्या बैठकीत आगामी काळातील काँग्रेस पक्षाची भूमिका, संघटनात्मक बांधणी, जिल्ह्यातील राजकीय रणनीती तसेच विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात आली. या निवडीबद्दल आनंद व्यक्त करत लहू निवंगुणे म्हणाले, "काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी माझ्यासारख्या सर्वसामान्य, शेतकऱ्याच्या मुलाला जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी दिली, याबद्दल त्यांचे आभार मानतो. जिल्ह्यामध्ये ग्रामीण भागात सद्यस्थितीत काँग्रेसला कोणी मोठा नेता नसला किंवा पक्षाची ताकद थोडी कमी असली, तरी सर्वसामान्य कार्यकर्ता काँग्रेससोबत कायम आहे. या सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या जीवावर ग्रामीण भागात काँग्रेसला सक्षम करण्याचा माझा प्रयत्न राहणार आहे. २०२९ मध्ये राहुल गांधी यांना पंतप्रधान करण्यासाठी जीवाचे रान करून पक्ष वाढवणार आहोत." शिवराज मोरे म्हणाले, "गेल्या अनेक वर्षांपासून काँग्रेस पक्षाच्या संघटनेत कार्यकर्ता ते वरिष्ठ पदाधिकारी म्हणून निवंगुणे यांनी उत्तम कार्य केले आहे. सामान्य घरातून आलेल्या कार्यकर्त्याला जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी मिळाली असून, पुणे जिल्ह्यात काँग्रेस पक्षाला बळकट करण्यासाठी त्यांची निवड उपयुक्त ठरेल.

# लालपरीचा ७८ वा वर्धापनदिन साजरा

**राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

राजगुरूनगर येथील राजगुरुनगर एसटी बसस्थानकावर एसटी महामंडळाच्या लालपरीचा ७८ वा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. यावेळी कर्मचाऱ्यांनी प्रवाशांना गुलाबपुष्प देऊन त्यांचा सन्मान केला.

यावेळी गाडीला व बसस्थानकाला आकर्षक सजावट करण्यात आली होती. तसेच बसस्थानकावर आकर्षक रांगोळी रेखाटली होती. एसटीचे कर्मचारी बसस्थानकावर प्रवाशांचे स्वागत करताना दिसत होते. वर्धापनदिनानिमित्त गाडीची पूजा झाल्यानंतर प्रवाशी बांधवांच्या हस्ते केल कापण्यात आला. प्रवाशांना गुलाबपुष्प व पेढे वाटण्यात आले. याप्रसंगी वरीष्ठ आगारव्यवस्थापक विद्या कदम, कनिष्ठ आगारव्यवस्थापक उज्वला कुटे, वाहतूक निरीक्षक प्रविण तुपसांगवे, सहायक वाहतूक निरीक्षक एम. एफ. सय्यद, स्थानक प्रमुख उत्तम लांडे उपस्थित होते. याप्रसंगी भाषणात बोलताना वरीष्ठ आगारव्यवस्थापक विद्या कदम यांनी एसटीचे महत्व व कर्मचाऱ्यांची जबाबदारी याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तर आगारव्यवस्थापक उज्वला कुटे यांनी प्रवासी व कर्मचारी यांना लालपरीच्या वर्धापनदिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. वरिष्ठ लिपिक स्नेहा कातोरे, कामगार संघटना सचिव दत्तात्रय गभाले, आगार लेखाकार नेहा टाक, पुष्पा चासकर, रोहीणी साबळे, रंजना बिराजदार, स्वाती बिराजदार, मनिषा सुतार, विजया बगाटे, पंढरीनाथ शिवले यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

यावेळी वाहतूक नियंत्रक चंद्रकांत लोखंडे, सोमनाथ आढळ, पी. ए. किर्दक, मोहन गोपनारायण, प्रशांत दौंडकर, शशिकांत शिंदे, मंगेश वाळूंज, राहुल पाटोळे, राजेश दौंडकर, अविनाश वाडेकर, वैभव सावंत, अंकुश पाटील, हनुमंत घाडगे आदी उपास्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्तात्रय गभाले यांनी केले.



• राजगुरुनगर एसटी बसस्थानकावर एसटी महामंडळाचा ७८ वा वर्धापनदिन बसस्थानकावर आकर्षक रांगोळी रेखाटून व बसचे पुजन करुन साजरा करण्यात आला. (छायाचित्र : किरण खुडे, राजगुरुनगर) •

# देवस्थानांचा कायद्याच्या विरोधात रणशिंग!

- **राज्यभर घंटानाद, महाआरती, स्वाक्षरी अभियान, तसेच मुंबईतून महाआंदोलनाचा सरकारला इशारा!**
- **जमिनी वाचल्या, तरच देवस्थाने सुरक्षित राहतील - मंदिर विश्वस्तांचे ठाम मत**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"देवस्थानांच्या जमिनी वाचल्या तरच मंदिरे आणि आपले धर्मकार्य सुरक्षित राहील, त्यामुळे सरकारने या जमिनी अधिग्रहित करण्याचे काम तात्काळ थांबवावे," असा ठाम व स्पष्ट इशारा देत भीमाशंकर ज्योतिर्लिंग देवस्थान आणि अष्टविनायक समितीसह पुणे पंचक्रोशीतील शेकडो प्रमुख देवस्थानांनी ‘महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन (प्रारूप) अधिनियम, २०२६’ या कायद्याच्या विरोधात पुण्यातून थेट रणशिंग फुंकले आहे. या जाचक कायद्याला कडाडून विरोध करण्यासाठी आणि सरकारला वेळेत पावले उचलण्याची चेतावणी देण्यासाठी मंदिर महासंघाच्या वतीने पुण्यात महत्त्वपूर्ण बैठका पार पडल्या.

या कायद्याविरोधात पुढील २५ दिवसांत लाखो कायदेशीर हरकती नोंदवण्यासह, राज्यभर व्यापक स्वाक्षरी अभियान, प्रत्येक मंदिरात महाआरती, आगामी पावसाळी अधिवेशनादरम्यान विधिमंडळावर 'घंटानाद आंदोलन' आणि गरज पडल्यास मुंबईच्या आझाद मैदानावर 'महाआंदोलन' छेडण्याचा, तसेच लवकरच 'राज्यस्तरीय देवस्थान भूमी संरक्षक परिषद' आयोजित करण्याचा एकमुखाने निर्धार करत मंदिर विश्वस्तांनी मैदानात उतरण्याची घोषणा केली आहे.

पुण्यातील श्री सिद्धिविनायक मंदिर (सारसबाग), खंडोबा मंदिर (आकुर्डी) आणि श्री सियाराम मंदिर, गोशाळा (हडपसर) येथे पार पडलेल्या या बैठकांमध्ये ज्येष्ठ अधिवक्ता एस. के. जैन यांनी, देवस्थानांचे अस्तित्व टिकवण्यासाठी त्यांच्या जमिनी सुरक्षित राहणे अत्यंत आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. माजी धर्मादाय आयुक्त दिलीप देशमुख यांनी या कायद्यामागील शासनाचा हेतू संशयास्पद वाटत असल्याचे सांगत विश्वस्तांना जास्तीत जास्त हरकती नोंदवण्याचे आवाहन केले. तसेच, रांजणगाव महागणपती देवस्थानचे विश्वस्त डॉ. तुषार पाटील पाचुंदकर यांनी अष्टविनायक मंदिरांचा या कायद्याला तीव्र विरोध दर्शवला, तर भीमाशंकर देवस्थानचे अधिवक्ता सुरेश कौदरे यांनी सेवाधाऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्याची मागणी केली.

मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक सुनील घनवट यांनी हा लढा मंदिरांच्या अस्मितेचा असल्याचे सांगत २ जून रोजी विभागीय आयुक्तांना निवेदन देऊन राज्यभर आंदोलनाचा श्रीगणेशा केला जाईल, अशी चेतावणी सरकारला दिली.

या आंदोलनाची रणनीती निश्चित करण्यासाठी आणि प्रत्येक मंदिरात जनजागृतीचे फलक लावून व्यापक लोकचळवळ उभी करण्यासाठी राज्यभरातील प्रमुख विश्वस्त एकवटले आहेत.

## तोशिबाकडून ‘पॉवरग्रिड’ला १३२ किलोवोल्ट सिस्टीम सुपूर्द




- **आपल्या स्वदेशी एम-जीआयएस पोर्टफोलिओचा विस्तार**

**हैदराबाद (दै. आरंभ पर्व)**

भारताच्या पहिल्या 220 केव्ही एम-जीआयएस सिस्टीमच्या सादरीकरणानंतर आपल्या स्वदेशी एम-जीआयएस पोर्टफोलिओचा आणखी विस्तार करत, तोशिबा ट्रान्समिशन अँड डिस्ट्रिब्युशन सिस्टीम्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड (टीटीडीआय) ने आज पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड (पॉवरग्रिड) कडे स्वदेशी विकसित 132 केव्ही एम-जीआयएस सिस्टीम यशस्वीपणे सुपूर्द केल्याची घोषणा केली.

132 केव्ही एम-जीआयएस सिस्टीमचा विकास आणि त्याची सुपूर्दता हा भारतातील स्वदेशी मोबाईल हाय-व्होल्टेज सोल्यूशन्स पोर्टफोलिओचा विस्तार करण्याच्या टीटीडीआयच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमधील आणखी एक महत्त्वाचा टप्पा आहे. उपकरणांच्या विशिष्ट गरजा पूर्ण करण्यासाठी पॉवरग्रिडला पुरवण्यात आलेली ही प्रणाली, ग्रीड आधुनिकीकरण, लवचिकता आणि स्वदेशीकरणाच्या दिशेने भारताच्या सुरू असलेल्या प्रवासाला देखील बळ देते.

या महत्त्वाच्या टप्प्यावर, टीटीडीआयचे चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर श्री. हिरोशी फुरुता म्हणाले, “पॉवरग्रिडला स्वदेशी 132 केव्ही एम-जीआयएस सिस्टीम सुपूर्द करून आमच्या एम-जीआयएस पोर्टफोलिओचा आणखी विस्तार करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. काही महिन्यांपूर्वीच भारताच्या पहिल्या स्वदेशी 220 केव्ही एम-जीआयएस सिस्टीमच्या यशस्वी सुपूर्ततेनंतर लगेचच हा टप्पा गाठला गेला आहे.

# राजकीय गणितात 'पुणेच'

• विक्रम काकडेंच्या उमेदवारीमागील राजकीय गणित, पुण्यात दोन दिवसांतच फिरली समीकरणे



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेल्या मोर्चेबांधणीचा शेवट सोमवारी एका नाट्यमय राजकीय घडामोडीत झाला. पक्षातील अनेक दिग्गज शर्यतीत असतानाही त्यांना मागे टाकत अखेर बांधकाम व्यावसायिक आणि भाजप नेते संजय काकडे यांचे पुत्र विक्रम काकडे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले.

राष्ट्रवादी काँग्रेसमधील शहराध्यक्ष सुनील टिंगरे, माजी शहराध्यक्ष दीपक मानकर, पिंपरी-चिंचवडमधील संदीप वाघिरे, विलास लांडे, नाना काटे, योगेश बहल, भाऊसाहेब भोईर तसेच जिल्ह्यातील रणजित शिवतारे, दिलीप मोहिते, रमेश थोरात यांच्यासह अनेक अनुभवी नेते विधान परिषद मतदारसंघ निवडणुकीसाठी इच्छुक होते. पक्ष संघटनेत काम केलेल्या अनुभवी नेत्याला संधी मिळणार की नव्या चेहऱ्याला, याबाबत उत्सुकता निर्माण झाली होती.

दरम्यान, अखेरच्या टप्प्यात विक्रम काकडे यांचे नाव चर्चेत आले. रविवारी दिवसभर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार पार्थ पवार यांच्यासह पक्षातील वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत इच्छुकांच्या नावांवर सविस्तर चर्चा झाली. बैठकीत पक्षातील अनुभवी नेत्याला उमेदवारी द्यावी, अशी भूमिका इच्छुकांनी मांडली. मात्र काकडे यांच्या उमेदवारीसाठी पक्षातील एका नेत्याने चांगलाच आग्रह धरला. त्याबाबत एका नेत्याने नकारात्मकता दर्शविली. त्याचबरोबर इच्छुक नेत्यांची नाराजी कमी करण्यासाठीही रविवारी रात्रभर प्रयत्न सुरू होते. सोमवारी सकाळी पक्षाचे ज्येष्ठ नेते दिलीप वळसे-पाटील यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीनंतर घडामोडींना वेग आला. त्यानंतर संजय काकडे आणि विक्रम काकडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अधिकृत प्रवेश केला. पक्ष नेतृत्वाने बाहेरून आलेल्या उमेदवाराला संधी दिल्यामुळे काही नेत्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली, तर पक्षाच्या स्थानिक पातळीवरील पदाधिकाऱ्यांनी राजानीमा अस्त्र उगारले.

## 'महापालिके'पासूनच 'साखरपेरणी'

विक्रम काकडे यांचे नाव अलीकडे चर्चेत आले असले, तरी त्यांच्या उमेदवारीसाठी महापालिका निवडणुकीपासूनच 'साखरपेरणी' करण्यात आल्याची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली. त्यांचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार, पार्थ पवार यांच्याशी असलेले जवळकीचे नाते लक्षात घेऊन संजय काकडे यांनीही राष्ट्रवादीसमवेत जुळवून घेण्यास सुरुवात केली.

# 'रसायू'च्या माध्यमातून जागतिक दर्जाच्या आयुर्वेद संशोधनाचे कार्य

## गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांचे प्रतिपादन; रसायू लाईफ सायन्सेसच्या कर्वेनगर येथील नूतन वास्तूचे उद्घाटन






**पुणे (दै. आरंभ पर्व)**
"हजारो वर्षांची परंपरा असलेल्या आयुर्वेदाला २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजाश्रय दिला आणि स्वतंत्र आयुष मंत्रालयाची स्थापना करून आयुर्वेदशास्त्राच्या संशोधनासाठी मार्ग मोकळा केला. वैद्य योगेश आणि वैद्य विनीता बेंडाळे यांची रसायू लाईफ सायन्सेस ही संस्था, आयुर्वेदातील संशोधनावर आधारित औषधांसाठी सकारात्मक कार्य, जागतिक मान्यताप्राप्त प्रमाणित नवी औषधे संशोधित करत आहे, हे अभिमानास्पद आहे. या नव्या वास्तूच्या माध्यमातून आयुर्वेद संशोधनाचे कार्य अधिक गतिमान होईल," असे प्रतिपादन गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी केले.

गेल्या तीन दशकांहून अधिक काळ आयुर्वेदाला संशोधन व तंत्रज्ञानाची जोड देत हजारो रुग्णांना बरे करणाऱ्या रसायू लाईफ सायन्सेस या संस्थेच्या नूतन वास्तूचा उद्घाटन सोहळ्यात ते बोलत होते. डॉ. सावंत यांच्या हस्ते आणि विज्ञान-तंत्रज्ञान विषयक संसदीय स्थायी समितीच्या अध्यक्षा व राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला. कर्वेनगर येथील संस्थेच्या वास्तूत झालेल्या सोहळ्यात निमंत्रक वैद्य योगेश बेंडाळे, वैद्य विनिता बेंडाळे उपस्थित होते. दीपप्रज्वलन आणि धन्वंतरी पूजन व स्तवनाने कार्यक्रमाचा आरंभ झाला.

डॉ. प्रमोद सावंत म्हणाले, "आयुर्वेदाला पाच हजार वर्षांहूनही मोठी परंपरा आहे. मात्र, मध्यंतरीच्या काळात आयुर्वेद दुर्लक्षित राहिला. अगदी देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावरही आयुर्वेदाकडे योग्य तसे लक्ष दिले गेले नाही. केंद्रात नरेंद्र मोदी यांचे सरकार येताच, परिस्थिती बदलली. आयुष मंत्रालयाच्या निर्मितीने, आयुर्वेद संशोधनाला राजाश्रय मिळाला आणि संशोधनाने गती घेतली. बेंडाळे यांनी ३० वर्षांहून अधिक काळ सुरू ठेवलेले संशोधन, डाटा, केस स्टडीज आणि आधुनिक काळातील पर्सनलाईज मेडिसीन या संकल्पनेचे आयुर्वेदाशी असलेले नाते यांचा मेळ कौतुकास्पद आहे. विशेषतः कर्करोगाच्या विविध प्रकारांवर बेंडाळे यांचे संशोधन मोलाचे आहे."

प्रा. डा. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, "बेंडाळे हे लोकसेवेचे व्रत घेऊन आयुर्वेदप्रणित संशोधन करत आहेत. रोगाच्या मूळाशी जाऊन विचार व उपचार करण्याची त्यांची पद्धत आणि देशविदेशांत सातत्याने आयुर्वेदप्रणित संशोधन शास्त्रशुद्ध पद्धतीने सादर करण्याचा त्यांचा उपक्रम उल्लेखनीय आहे. तसेच परवडणारी औषधे विकसित करण्याचा प्रयत्न महत्त्वाचा आहे."

वैद्य योगेश बेंडाळे म्हणाले, "१९९६ पासून पाश्चात्त्य वैद्यकाच्या तुलनेत आयुर्वेद हे शास्त्र म्हणून कमी पडते आहे की आयुर्वेदतज्ज्ञ कमी पडत आहेत, याचा शोध घेताना, रसायू लाईफ सायन्सेसची संकल्पना रुजली. ३० वर्षांच्या अथक संशोधनातून ४५ पेक्षा जास्त पेटंट्स प्राप्त करण्यापर्यंत प्रवास झाला आहे. नुकतेच जगातले पहिले ओरल ड्रग (तोंडाने घ्यावयाचे औषध) जागतिक आरोग्य व्यासपीठावर सादर केले आहे. नव्या वास्तूमधूनही संशोधनावर भर देत निरामयतेकडे वाटचाल करण्याचा प्रयत्न राहील."

डॉ. प्रतीक तोरणे यांनी सूत्रसंचालन केले. वैद्य योगेश बेंडाळे यांनी आभार मानले.

# दैनंदिन अंघोळीत आता त्वचेच्या विशेष काळजीचा स्पर्श

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
भारतातील सर्वाधिक विश्वासार्ह आणि डॉक्टरांनी सर्वाधिक शिफारस केलेल्या बेबी केअर ब्रँडपैकी एक असलेल्या 'हिमालया बेबीकेअर'ने 'हिमालया जेंटल बेबी सोप' आणि 'रिफ्रेशिंग बेबी सोप' या दोन उत्पादनांसाठी दोन नवीन जाहिराती प्रदर्शित केल्या आहेत. "मोअर दॅन क्लीन्सिंग. इट्स केअर." या संदेशासह बेबी सोपचा हा पोर्टफोलिओ नव्या पद्धतीने कंपनीने सादर केला आहे. कंपनीचे हे महत्त्वाचे धोरण मानले जात आहे. नवजात बाळांच्या त्वचेच्या गरजांची कंपनीला असलेली सखोल जाण लक्षात घेऊन करण्यात आलेला हा बदल




आजच्या पालकांच्या बदलत्या अपेक्षांशी सुसंगत असल्याचे दिसून येते.

या पालकांना केवळ सुरक्षित उत्पादने नको असतात, तर नवजात बाळांसाठी आणि लहान मुलांसाठी दैनंदिन वापरता येतील अशी सौम्य स्वरुपाची काळजी घेणारी, तसेच ऋतू बदलांदरम्यान त्वचेची जपणूक करणारी विशेष उत्पादने हवी असतात. 'जेंटल बेबी सोप'वरील ही फिल्म एका शांत आणि भावनिक क्षणातून पुढे सरकते.

# आगळावेगळा स्तुत्य सामाजिक विधायक उपक्रम

## निखिल भैय्या कांचन मित्र परिवाराकडून ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान


**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**
उरुळी कांचन गावाचा सांस्कृतिक वारसा आणि परंपरा जपण्याचे महत्त्वपूर्ण कार्य शिवाजी नाना कांचन यांचे कुटुंब करत असून, समाजात सकारात्मक विचारांची गरज आज अधिक असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष देविदास भन्साळी यांनी केले. उरुळी कांचन (ता. हवेली) येथे नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या आदर्श ज्येष्ठ नागरिक सन्मान सोहळ्यात ते बोलत होते. या कार्यक्रमात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष देविदास भन्साळी, अरुणा हेंद्रे, रत्नप्रभा भोर, ज्ञानदेव लिंबोरे, गुलाबराव गायकर, सोपान शितोळे आणि



राजेश फुलपगर यांचा वाढदिवसही साधेपणाने व उत्साहात निखिल भैय्या कांचन मित्र परिवाराच्या वतीने साजरा करण्यात आला.

यावेळी युवा उद्योजक निखिल भैय्या कांचन म्हणाले की, "योग्य दिशादर्शक आणि मार्गदर्शक लाभले तर आयुष्यातील निर्णय योग्य ठरतात. ज्येष्ठ नागरिकांचे अनुभव, मार्गदर्शन आणि त्यांनी दिलेले संस्कार यामुळेच आमच्या आयुष्याचा सुवर्णकाळ घडला आहे. त्यांचे प्रेम, त्याग आणि आशीर्वाद हीच आमची खरी संपत्ती आहे." कार्यक्रमात उपस्थित ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या आयुष्यातील विविध अनुभव आणि आठवणींना उजाळा दिला. उरुळी कांचन पतसंस्थेचे संचालक शिवाजी कांचन यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार एम. जी. शेलार, नारायण कांचन, महंत गोपालव्यास कपाटे, कोंडिराम चौधरी, एकनाथ चौधरी, सोनबा चौधरी, पंडित महाडिक, प्रतिभा कांचन, सुरेखा भन्साळी, शिल्पा लेले, प्रसन्न भोर, राजेंद्र कांचन, दादा गोते, सुरेश सातव, संदीप कांचन, सचिन कांचन, सुनील तुपे, सारिक सय्यद यांच्यासह अनेक मान्यवर, स्नेही व कुटुंबीय उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पत्रकार सुवर्णा कांचन यांनी केले. अल्पोपहारानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. या उपक्रमामुळे ज्येष्ठ नागरिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत सामाजिक बांधिलकी जपण्याचा आदर्श संदेश समाजापुढे ठेवण्यात आला.

# थोडक्यात पण महत्वाचे



## बारामतीत गारपिटीचा फळबागांना तडाखा; केळीचे पीक जमीनदोस्त

बारामती (आरंभ पर्व) : वडगाव निंबाळकर (ता. बारामती) परिसरात रविवारी (ता. ३१) सायंकाळी वादळी वाऱ्यासह जोरदार गारपीट झाली. यामुळे फळबागांचे मोठे नुकसान झाले. गारांच्या तडाख्यामुळे केळी, पेरू व अन्य फळपिकांना मोठा फटका बसला आहे. गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. गारपिटीचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांच्या फळबागांना बसला. येथील शेतकरी अनिलकुमार शहा यांच्या शेतातील केळी व पेरू बागेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. फळधारणेच्या अवस्थेतील झाडांवर गारांचा जोरदार मारा झाल्याने फळे गळून पडली, तर अनेक झाडांचे नुकसान झाले. तसेच मिलिंद बोकील, संजय निंबाळकर आणि सरपंच सुनील ढोले यांच्या केळी बागांतील अनेक झाडे वादळी वाऱ्यामुळे उन्मळून पडली आहेत.

## १६ वर्षाच्या मुलींचा बालविवाह

लोणी काळभोर (आरंभ पर्व) : बालविवाह करणे कायद्याने गुन्हा असल्याचे माहिती असतानादेखील १६ वर्षीय अल्पवयीन मुलीचा विवाह लावून दिल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी मुलीच्या आईसह पती, सासू आणि सासऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, बालविवाहासाठी खोटे आधारकार्ड आणि बनावट जन्मदाखला सादर केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी पीडित १६ वर्षीय मुलीने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून आई संगिता आसाराम मुंडे (वय ३५, रा. लोणी काळभोर), पती सुरज दिलीप उकिरडे (वय २६), सासू अरुणा दिलीप उकिरडे व सासरे दिलीप उकिरडे (रा. संभाजीनगर, कदमवाकवस्ती, लोणी काळभोर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी मुलगी अल्पवयीन असल्याची कल्पना असतानाही तिच्या वयाची खोटी कागदपत्रे तयार करून २ डिसेंबर २०२५ रोजी आळंदी देवाची येथील सौभाग्य मंगल कार्यालयात तिचा विवाह सुरज उकिरडे याच्याशी लावून देण्यात आला. पीडित मुलीने दिलेल्या तक्रारीनंतर या घटनेची गंभीर दखल घेण्यात आली. लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आळंदी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमा नरके यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे. घटना आळंदी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडल्याने 'झिरो एफआयआर'द्वारे गुन्हा नोंदवून पुढील तपासासाठी प्रकरण आळंदी पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आले आहे. अल्पवयीन मुलींच्या विवाहाला कायद्याने बंदी असतानाही खोटी कागदपत्रे तयार करून बालविवाह लावल्याचा आरोप समोर आल्याने परिसरात खळबळ उडाली असून, संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी होत आहे. या प्रकरणातील पती सुरज दिलीप उकिरडे याचे नाव यापूर्वीही एका गुन्ह्यात समोर आले होते.



# अध्यक्षपदी सीएमए राहुल चिंचोळकर

## उपाध्यक्षपदी दवे, सचिवपदी मंत्रवादी, खजिनदारपदी टिकले

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
दी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या पुणे चॅप्टरच्या अध्यक्षपदी सीएमए राहुल चिंचोळकर यांची निवड झाली आहे. मावळते अध्यक्ष सीएमए श्रीकांत इप्पलपल्ली यांच्याकडून त्यांनी कार्यभार स्वीकारला. उपाध्यक्षपदी सीएमए हिमांशू दवे, सचिवपदी सीएमए तनुजा मंत्रवादी, तर खजिनदारपदी सीएमए अमेय टिकले यांची निवड झाली आहे. २०२६-२७ या वर्षाकरिता नव्या कार्यकारिणीची निवड नुकतीच करण्यात आली. व्यवस्थापन समिती सदस्य म्हणून सीएमए श्रीकांत इप्पलपल्ली, सीएमए निलेश केकाण, सीएमए नागेश भागणे, सीएमए अनुजा दाभाडे आणि सीएमए निखिल अगरवाल यांचा समावेश आहे. यावेळी 'आयसीएमएआय'च्या विभागीय समितीचे सदस्य सीएमए चैतन्य मोहरीर, ज्येष्ठ सदस्य व माजी अध्यक्ष सीएमए डॉ. धनंजय जोशी, सीएमए डॉ. संजय भार्गवे, सीएमए डॉ. एन. के. निमकर, सीएमए अभय देवधर, सीएमए प्रमोद दुबे, सीएमए प्रसाद जोशी, सीएमए मीना वैद्य आणि संस्थेच्या सर्व सदस्यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

'आयसीएमएआय' पुणे चॅप्टरच्या अध्यक्षपदी काम करण्याची संधी दिल्याबद्दल आभार मानून सीएमए राहुल चिंचोळकर म्हणाले, " संस्थेच्या ज्येष्ठ व माजी पदाधिकाऱ्यांनी माझ्यावर विश्वास दाखवून ही जबाबदारी दिल्याबद्दल आभार व्यक्त करतो. त्यांच्या मार्गदर्शनाखाली येणाऱ्या काळात आणखीन चांगले काम करण्याचा माझा प्रयत्न राहील. वाणिज्य किंवा इतर क्षेत्रातील विद्यार्थ्यांना करिअरची उत्तम संधी उपलब्ध करून देणारी ही संस्था आहे. गेल्या सात दशकांची उज्ज्वल परंपरा असलेल्या या संस्थेच्या अध्यक्षपदी काम करणे हा आनंदाचा क्षण आहे. राष्ट्रनिर्माणाच्या दृष्टीने माझ्या परीने शक्य तितके योगदान देण्याचा माझा प्रयत्न राहणार आहे. आगामी वर्षात विद्यार्थी व सदस्यांसाठी विविध उपक्रम, मार्गदर्शन सत्रे, कार्यशाळा, एआय व अन्य प्रगत अभ्यासक्रम राबविण्यावर भर दिला जाणार आहे." सीएमए श्रीकांत इप्पलपल्ली यांनी गेल्या वर्षभरात राबविलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला. सीएमए हिमांशू दवे, सीएमए तनुजा मंत्रवादी, सीएमए अमेय टिकले यांनीही निवडीबद्दल आनंद व्यक्त करत मनोगत मांडले. डॉ. संजय भार्गवे यांनी मार्गदर्शन केले.

# सफारी गाडी पलटी होऊन सहा जण जखमी, दोघे जण गंभीर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
मुठा खोऱ्यातील आंदगाव (ता. मुळशी) येथील लवासा रस्त्यावर सफारी गाडी पलटी होऊन सहा जण जखमी झाल्याची घटना घडली. या अपघातातील दोघे जण गंभीर जखमी झालेले आहेत. अपघातग्रस्त सर्व तरुण हे बाणेर येथील आहेत. पौड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आज सोमवारी (ता. १) रोजी रात्री आठ वाजता ही घटना घडली. लवासावरून सफारी गाडीने (एम एच १२ जीआर १११२) तीन तरुण व तीन तरुणी असे सहाजण मुठा गावच्या दिशेने जात होते. आंदगाव येथील लवासा रस्त्यावर रात्री आठ वाजता चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने सफारी गाडीने तीन ते चार पलट्या घेतल्या व गाडी रस्त्यालगतच्या एका झाडाला धडकली त्यात सहाजण जखमी झाले असून दोघे जण गंभीर जखमी आहेत. गंभीर जखमींमध्ये एक तरुण व एका तरुणीचा समावेश आहे. जखमींना पिरंगुट येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलेले आहे. पुढील तपास पौड पोलिस करीत आहेत. स्वराज जीवन ताम्हाणे (वय-२८, रा. बाणेर, पुणे), कुणाल नामदेव भोसले (वय-२८ रा. बाणेर), निशा खराटे (पूर्ण नाव व पत्ता माहीत नाही), शंकर चव्हाण (पूर्ण नाव माहित नाही), नंदिनी (पूर्ण नाव व पत्ता माहित नाही), पाडाळे (मुलगी, पूर्ण नाव माहित नाही)

# महिलांच्या सक्षमीकरणासाठी '#DriveHerFuture' उपक्रम

## अमृता फडणवीस, भूमी पेडणेकर आणि सहर भामला एकत्र

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**
महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना देतानाच स्वच्छ वाहतूक आणि हवामान कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी भामला फाउंडेशनतर्फे 'पिंक ई-रिक्षा सपोर्ट इनिशिएटिव्ह – #DriveHerFuture' या उपक्रमाचे मुंबईत भव्य लाँच करण्यात आले. जागतिक पर्यावरण दिनाच्या पार्श्वभूमीवर सादर करण्यात आलेला हा उपक्रम महिलांची उपजीविका, हरित वाहतूक आणि शाश्वत विकास यांना एकत्र जोडणारा महत्त्वपूर्ण उपक्रम मानला जात आहे. मुंबईतील जमनाबाई नरसी स्कूल येथे आयोजित कार्यक्रमात अमृता फडणवीस, अभिनेत्री व पर्यावरण कार्यकर्त्या भूमी पेडणेकर, अपर्णा पुरोहित आणि भामला फाउंडेशनच्या सहर भामला यांची प्रमुख उपस्थिती होती. या अभियानाचा उद्देश महिलांना स्वच्छ वाहतुकीच्या माध्यमातून रोजगार, आत्मविश्वास आणि आर्थिक स्वावलंबनाच्या संधी उपलब्ध करून देणे हा आहे. '#DriveHerFuture' अंतर्गत पिंक ई-रिक्षा हे केवळ वाहन नसून महिलांच्या सक्षमीकरणाचे आणि पर्यावरणपूरक भविष्यातील बदलाचे प्रतीक म्हणून सादर करण्यात आले. महिलांना ग्रीन मोबिलिटीच्या केंद्रस्थानी ठेवत हा उपक्रम हवामान जनजागृतीच्या पुढे जाऊन प्रत्यक्ष कृतीचे मॉडेल निर्माण करण्याचा प्रयत्न करतो. यावेळी अमृता फडणवीस यांनी महिलांच्या सन्मान, स्वावलंबन आणि सामाजिक सहभागाचा संदेश दिला. भूमी पेडणेकर यांनी हवामान बदलांविरोधातील कृतीची गरज अधोरेखित केली, तर अपर्णा पुरोहित यांनी समाजातील सकारात्मक बदलांसाठी अशा उपक्रमांचे महत्त्व सांगितले. सहर भामला यांनी युवा नेतृत्वाखालील हवामान कृतीची भूमिका स्पष्ट केली. सहर भामला म्हणाल्या, "#DriveHerFuture हा एका साध्या विश्वासावर आधारित उपक्रम आहे. महिलांना मोबिलिटी आणि उपजीविकेच्या संधी उपलब्ध झाल्या तर त्यांना आत्मविश्वास, स्वातंत्र्य आणि स्वतःचे निर्णय घेण्याची ताकद मिळते. पिंक ई-रिक्षा ही उत्पन्न, स्वावलंबन आणि आपल्या शहरांसाठी स्वच्छ भविष्यातील दिशेचे प्रतीक आहे."




कार्यक्रमात पिंक ई-रिक्षा उपक्रमाचे औपचारिक अनावरण, अभियानाशी संबंधित दृश्य सादरीकरण, संवाद सत्र, फोटोसेशन आणि माध्यम प्रतिनिधींशी संवाद यांचा समावेश होता. हा उपक्रम भामला फाउंडेशनच्या #NowForClimate आणि #BhoomiNamaskar या व्यापक पर्यावरण अभियानांशीही जोडलेला आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.


दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
CELEBRATING EXCELLENCE
HONORING IMPACT
On the occasion of the anniversary of
Daily Aarambh Parv
GRAND
AARAMBH PARV
STATE-LEVEL GAURAV AWARD CEREMONY
2026
Distinguished personalities who have made remarkable contributions in various fields such as Social Service, Journalism, Education, Art, Literature, Industry, Healthcare, Agriculture, Youth Empowerment and Women Empowerment will be honored at this event.
VENUE : To be announced soon
DATE : SEPTEMBER 2026
AARAMBH PARV GAURAV AWARDS 2026
HONORING EXCELLENCE ACROSS DIVERSE FIELDS
SOCIAL SERVICE
JOURNALISM
EDUCATION
ART & LITERATURE
INDUSTRY
YOUTH EMPOWERMENT
HEALTHCARE
AGRICULTURE
WOMEN EMPOWERMENT
ORGANIZED BY
DAILY AARAMBH PARV FAMILY
FOR NOMINATIONS & MORE INFORMATION
Mr. Laxman Sable, Pune 8605284272
Mr. Pratik Gangane, Pune 7276314142
Mr. Abhishek Margale 9359421909
Aarambh of those deeds... that create a new history!


सुवर्णसंधी!
InDesign ऑपरेटरची गरज आहे!
मासिक पगार
आकर्षक पगार दिला जाईल
घरून काम (Work From Home)!
अनुभवी आणि कल्पक ऑपरेटर हवा
मासिक पगार (पात्रतेनुसार)
इन-डिझाइन सॉफ्टवेअरचे उत्तम ज्ञान
कामाचे लवचिक तास
संपर्क : ७२७६३१४१४२/८६६७८६५७०२


आपला स्वत:चा
न्यूज पोर्टल वेबसाईट
बनून मिळेल
फक्त
₹5000/-
मध्ये
आपली बातमी
आपला आवाज
आपले व्यासपीठ
मोबाईल फ्रेंडली डिझाइन
बातम्या प्रकाशित करण्याची सोय
कॅटेगरी, टॅग, सर्च आणि आर्काईव्ह सुविधा
जाहिरात (Advertisement) स्लॉट
सोशल मीडिया शोअरिंग सुविधा
SEO फ्रेंडली आणि फास्ट वेबसाइट
1 वर्ष फ्री टेक्निकल सपोर्ट
आपले न्यूज
आजच संपर्क करा
9359421909
Abhibee.com
आपली ओळख... जगभर!


दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
पुणे प्रहार
NEWS CHANNEL
दैनिक आरंभ पर्व व पुणे प्रहार चॅनलसाठी
संपूर्ण महाराष्ट्रात
पत्रकार नेमणे आहे!
आपणही बना आमच्या टीमचा भाग !
महाराष्ट्राच्या प्रत्येक तालुका, जिल्हा आणि शहरातून प्रतिनिधी हवे आहेत.
आम्हाला हवे आहेत :
पात्रता
मराठी भाषा उत्तम लिहिता-बोलता येणे आवश्यक. पत्रकारितेचा अनुभव असणे प्राधान्य.
कामाचे स्वरूप :
बातम्या संकलन, लेखन, रिपोर्टिंग, फोटो/व्हिडिओ कव्हरेज, स्थानिक घडामोडींचे वृत्तांकन.
आम्ही देतो :
ओळखपत्र, व्यासपीठ, मार्गदर्शन आणि योग्य मानधन.
कार्य क्षेत्र :
संपूर्ण महाराष्ट्र (जिल्हा, तालुका, शहर व ग्रामीण भाग)
आमच्याशी जोडल्याने मिळेल :
विश्वसनीय वृत्तांकन
व्यापक वाचकवर्ग
नि:पक्ष व सकारात्मक पत्रकारिता
प्रत्यक्ष घडामोडींवर अचूक नजर
बातमी आहे... तर आमच्यापर्यंत पोहोचवा! समाजाचा आवाज बना!
आपली ओळख करा... आपला आवाज बुलंद करा!
संपर्क : 7276314142
आजच संपर्क साधा
आणि आमच्या टीममध्ये सहभागी व्हा!

दैनिक **आरंभपर्व**

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

## आपल्या जाहिरातींसाठी विश्वासार्ह व्यासपीठ

शासकीय, निमशासकीय, बँकिंग व सार्वजनिक जाहिरातींसाठी प्रभावी माध्यम

**आपल्या संस्थेच्या सर्व प्रकारच्या अधिकृत जाहिराती आता प्रसिद्ध करा दैनिक आरंभ पर्व मध्ये – विश्वास, पारदर्शकता आणि व्यापक वाचकवर्ग असलेले प्रभावी माध्यम.**

### आम्ही प्रसिद्ध करतो :

- शासकीय जाहिराती ✓
- ग्रामपंचायत जाहिराती ✓
- निविदा / टेंडर नोटीस ✓
- जाहीर नोटीस ✓
- बँकांचे ताळेबंद व लिलाव सूचना ✓
- सहकारी संस्था जाहिराती ✓
- शैक्षणिक संस्था सूचना ✓
- कोर्ट / कायदेशीर नोटीस ✓
- सार्वजनिक सूचना व प्रसिद्धीपत्रके ✓
- व्यवसायिक व व्यापारी जाहिराती ✓

### का निवडाल दैनिक आरंभ पर्व?

- ग्रामीण व शहरी भागात प्रभावी पोहोच
- कमी दरात उत्तम प्रसिद्धी
- जलद व अचूक प्रकाशन सेवा
- विश्वासार्ह आणि लोकप्रिय माध्यम
- डिजिटल व प्रिंट दोन्ही प्लॅटफॉर्मवर प्रसिद्धी




**आपल्या जाहिराती अधिकधिक लौकांपर्यंत पोहोचवण्यासाठी**

## आजच संपर्क साधा!

**संपर्क :** प्रतिक गंगणे
7276314142
8657865702

ई-मेल : aparvinfo@gmail.com

**दैनिक आरंभ पर्व** | “आपल्या विश्वासाचे वृत्तपत्र”